**महाराष्ट्र शासन**

संलेको २०१७/ प्र.क्र. ८४ /कोषा प्रशा २

वित्त विभाग,
मादामकामा मार्ग,
हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०००३२.
दि. १०/५/२०१८.

**प्रति,**

**१) श्री. सतिश शिवाजीराव तडकसे २) श्री. संजय चंद्रकांत शहा ३) श्री. बाळासाहेब रामनाथ घोरपडे ४) श्री. नारायण भास्कर रिंगणे ५) श्री. श्रीकिशन चुन्नीलाल श्रीरंगम ६) श्री. राजेंद्र धर्मराज मडके ७) श्री. बिभीषण व्यंकटराव तांबडे ८) श्री. चं. बा. बिवलकर**

विषय :- महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गात सन २०१७-२०१८ मध्ये पदोन्नतीने पदे भरण्यासाठी निवडसुची तयार करण्याबाबत.

महोदय,

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील पदे पदोन्नतीने भरण्याच्या अनुषंगाने आस्थापना मंडळाकडून आपला सन २०१७-१८ च्या संचालक संवर्गाच्या तात्पुरत्या निवडसुचीमध्ये समावेश करण्यात आला आहे.

२. संचालक संवर्गातील पदोन्नतीने पदस्थापनेकरीता शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही- २०१५/ प्र.क्र. १५६/ का- १२, दि. २८/४/२०१५ व दि. १६/७/२०१५ तसेच दि. १५/६/२०१७ अन्वये करण्यात आलेली दुसरी सुधारणा यामधील तरतुदी विचारात घेवून, आपला महसुली विभागाकरीताचा पसंतीक्रम ७ दिवसांचे आत आवश्यक त्या कागदपत्रासह शासनास सादर करावा. विहित मुदतीत विकल्प प्राप्त न झाल्यास नियमातील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल. विकल्प मागविण्याचा विहित नमूना सोबत जोडला आहे.

३. सदरचे पत्र व विकल्प मागविण्याचा विहित नमूना www.mahakosh.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आला असून, त्याकरीता स्वतंत्र पत्र निर्गमित केले जाणार नाही. यांची कृपया नोंद घ्यावी. संबंधित अधिकाऱ्यांनी आपले विकल्प shubhangi.sheth@nic.in / ad.admin@mahakosh.in या ई-मेल वर किंवा प्रत्यक्ष कोषा प्रशा-२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई या कार्यासनात सादर करावेत.

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा संचालक संवर्गातील रिक्त पदांची महसुली विभागनिहाय स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

| महसूल विभाग | रिक्त पदसंख्या |
|---|---|
| नागपूर | ०१ |
| अमरावती | ०० |
| औरंगाबाद | ०१ |
| नाशिक | ०२ |

| | |
|---|---|
| कोकण- १ | ०० |
| कोकण- २ | ०५ |
| पुणे | ०१ |

(शुभांगी शेठ)
सहसचिव, वित्त विभाग,
मंत्रालय, मुंबई.

प्रत :- संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
***(सदरचे पत्र व विकल्पाचा मसुदा आजच www.mahakosh.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याची कार्यवाही संचालनालयाने करावी.)***

# <u>विकल्पाचा नमुना</u>

यादीतील अ.क्र. ______

**शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग क्रमांक : एसआरव्ही -२०१५/प्र.क्र.१५६/का.१२,दिनांक २८/०४/२०१५ व दिनांक १६/०७/२०१५ व शासन अधिसुचना सामान्य प्रशासन विभाग क्र.एसआरव्ही २०१७/प्र.क्र.११४/कार्या १२,दि.१५.०६.२०१७ (दुसरी सुधारणा) नुसार विभागीय संवर्गाकरीता द्यावयाचा विकल्प.**

मी श्री/श्रीम ------------------------------------------------------ (सध्या कार्यरत कार्यालयाचे नांव)--------------------------------------------------------------------------------------------याद्वारे असे लिहून देतो /देते की, माझा महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा गट-अ संवर्गातील संचालक या पदावर पदोन्नतीच्या निवडसूचीत समावेश असल्याचे मला शासन वित्त विभागाचे पत्र क्रमांक क्र. संलेको २०१७/प्र.क्र.८४/कोषा प्रशा २, दिनांक १०.०५.२०१८ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पदास महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप (सुधारणा) नियम २०१५ लागू असून माझी संचालक पदावर पदोन्नतीने पदस्थापना झाल्यावर या नियमावलीतील तरतुदी मला लागू होणार आहेत. सदर नियमावलीतील तरतुदीच्या अनुषंगाने मी संचालक पदावर पदोन्नतीकरिता माझा पहिला पसंती क्रम # ------------------------- या महसूली विभागासाठी देत आहे.

तसेच *i) वरिल शासन अधिसूचनेतील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत नाही.

*i)वरिल शासन अधिसूचनेतील अ.क्र.७ मध्ये माझे प्रकरण येत असून त्याच्या पृष्ठयर्थ आवश्यक त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सोबत जोडल्या आहेत.

दिनांक :-

ठिकाण :- (सही)

(नांव)

# (१) नागपूर (२) अमरावती (३) औरंगाबाद (४)कोकण-१ (५) कोकण-२ (६)नाशिक (७ )पुणे यापैकी कोणताही महसूली विभाग नमूद करावा. ***लागु नसेल ते खोडावे**